**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com**

**उस्मानाबाद कृषी हवामान सल्ला** **मंगळवार, दिनांक – ३०.०६.२०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक ०१ ते ०५ जुलै, २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०१/०७ | ०२/०७ | ०३/०७ | ०४/०७ | ०५/०७ |
| पाऊस | १०.० | १३.० | ०६.० | १३.० | ०६.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३३.० | ३३.० | ३३.० | ३१.० | ३१.० |
| किमान तापमान (अं.से.) | २२.० | २२.० | २३.० | २२.० | २३.० |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९१ | ९० | ८८ | ८९ | ९० |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६२ | ६५ | ६१ | ७१ | ७२ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | १५ | १३ | १७ | २० | १८ |
| वा-याची दिशा | नैऋत्य | पश्चिम | पश्चिम | नैऋत्य | नैऋत्य |

| हवामानाचा इशारा | उस्मानाबाद जिल्हयात पुढील पाच दिवसात आकाश ढगाळ राहुन हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. विशेषत: दिनांक ३० जुन २०२० रोजी मराठवाडयात सर्व जिल्हयात तर दिनांक ०१ जुलै २०२० रोजी उस्मानाबाद जिल्हयात तुरळक ठिकाणी वादळी वा-यासह भारी स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात ज्या भागात पेरणीयोग्य पाऊस झाला नसेल (उस्मानाबाद जिल्हा : उस्मानाबाद, लोहारा, परांडा, तुळजापूर, उमरगा) येथे पेरणीची घाई करू नये. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| कापूस | वाढीची / लागवड अवस्था | वेळेवर लागवड केलेल्या कापूस पिकात हलकी कोळपणी करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. लागवड न झालेल्या ठिकाणी कापूस पिकाची लागवड १५ जुलैपर्यंत करता येते. बीटी कपाशीमध्ये कापूस + तूर (६ : १ किंवा ८ : २ किंवा १० : २), कापूस + सोयाबीन (१ : १), कापूस + मुग (१ : २), कापूस + उडीद (१ : १) ही आंतरपीक पध्दती घेतल्यास फायदेशीर ठरते. |
| सोयाबीन | पेरणी | पेरणीयोग्य पाऊस झालेल्या ठिकाणी जमिनीत पुरेसा ओलावा असल्याची खात्री करून बिजप्रक्रीया करून सोयाबीन पिकाची पेरणी करावी. |
| तुर | वाढीची / पेरणी अवस्था | वेळेवर पेरणी केलेल्या तुर पिकात हलकी कोळपणी करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. तुर पिकाची लागवड / पेरणी १५ जुलैपर्यंत करता येते. तुरीचे उत्पादन वाढविण्यासाठी तसेच जमिनीची उत्पादकता राखण्यासाठी तुर + बाजरी (१ : २ किंवा २ : ४), तुर + ज्वारी (३ : ३ किंवा २ : ४), तुर + कापूस (१ : ६ किंवा १ : ८) आणि तुर |

| | | |
|---|---|---|
| | | + सोयाबीन / मुग / उडीद (१ : २ किंवा २ : ४) असे ओळीचे प्रमाण ठेवून फायदेशीर आंतरपीक पध्दतीचा वापर केल्यास अधिक फायदा होतो. |
| मुग / उडीद | वाढीची / पेरणी अवस्था | वेळेवर पेरणी केलेल्या मुग / उडीद पिकात हलकी कोळपणी करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. मुग / उडीद पेरणी ०७ जुलैपर्यंत करता येते. आंतरपीक म्हणून मुग / उडीद या पिकांना विशेष महत्व प्राप्त आहे ते या पिकांच्या कालावधीमुळे, हे दोन्हीही पिके तुर, ज्वारी, कपाशीत आंतरपीक म्हणून घेता येतात. |
| भुईमूग | वाढीची / पेरणी अवस्था | वेळेवर पेरणी केलेल्या भुईमूग पिकात हलकी कोळपणी करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. भुईमूग पिकाची पेरणी ०७ जुलैपर्यंत करता येते. भुईमूगापासून अपेक्षित उत्पन्न मिळण्याची शाश्वती नसल्यास भूईमुग + तीळ (६ : २), भूईमुग + सुर्यफूल (६ : २), भुईमूग + कापूस (२ : १), भुईमूग + तुर (६ : २) या प्रमाणात पेरणी करून दोन्ही पिकांचे अधिक उत्पादन मिळते. |
| मका | वाढीची / पेरणी अवस्था | वेळेवर पेरणी केलेल्या मका पिकात हलकी कोळपणी करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. मका पिकाची पेरणी १५ जुलैपर्यंत करता येते. मका या पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी आंतरपीक महत्वाचे आहे. आंतरपिकासाठी कडधान्ये (उडीद, मुग, चवळी), तेलबिया (भुईमूग, सोयाबीन), भाजीपाला (मेथी, कोबी, कोथिंबीर, पालक) इत्यादी पिकांची लागवड करावी. |
| केळी | लागवड / वाढीची अवस्था | पाऊस झालेल्या ठिकाणी केळी फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी नवीन केळी पिकाची लागवड करावयाची असल्यास करण्यास हरकत नाही. |
| आंबा | लागवड / वाढीची अवस्था | पाऊस झालेल्या ठिकाणी आंबा फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी नवीन आंबा फळपिकाची लागवड करावयाची असल्यास करण्यास हरकत नाही. |
| द्राक्ष | लागवड / वाढीची अवस्था | पाऊस झालेल्या ठिकाणी द्राक्ष फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. द्राक्ष बागेतील बगलफुटी काढाव्यात. |
| सिताफळ | लागवड / वाढीची अवस्था | पाऊस झालेल्या ठिकाणी सिताफळ बागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी नवीन सिताफळ फळपिकाची लागवड करावयाची असल्यास करण्यास हरकत नाही. |
| भाजीपाला | रोप अवस्था | रोपवाटीकेत गादी वाफयावर लागवड केलेल्या रोपातील तणांचे व्यवस्थापन करावे. पाऊस झालेल्या ठिकाणी भाजीपाला पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| फुलशेती | वाढीची अवस्था | फुलपिकातील तणांचे व्यवस्थापन करावे. पाऊस झालेल्या ठिकाणी फुलपिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| पशुधन व्यवस्थापन | -- | पावसाळा सुरू झाल्यामुळे जनावरांवरील उष्णतेचा ताण कमी झाला आहे. त्यामुळे विशेषत: म्हशीमध्ये माजाची लक्षणे दिसतात किंवा नाही याकडे लक्ष ठेवावे. जनावरामध्ये माजाची लक्षणे दिसून आल्यास चांगल्या प्रतीच्या देशी गोवंश वळूकडून कृत्रिम रेतनाने भरवून घेतल्यास चांगल्या देशी गोवंश प्रजातीचे संवर्धन करता येईल. जर जनावरे माजाची लक्षणे दाखवत नसतील तर त्याची प्रजनन तपासणी तज्ञ पशुवैदयकाकडून करून आर्थीक नुकसान टाळावे. |

**सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.**